# खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे,

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय,

## राजगुरुनगर

## विद्यार्थी विकास मंडळ

## अहवाल

### जल्लोष युवक महोत्सव :

दिनांक १५ सप्टेंबर २०२५ रोजी डॉ. डी. वाय. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पिंपरी, पुणे येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत 'जल्लोष युवक महोत्सव' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना विविध कला व सांस्कृतिक स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली.

सदर महोत्सवामध्ये महाविद्यालयातील दोन विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. त्यापैकी एका विद्यार्थ्याने रांगोळी स्पर्धेत तर दुसऱ्या विद्यार्थ्याने चित्रकला स्पर्धेत सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे उत्कृष्ट सादरीकरण करून महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले.

या सहभागामुळे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला, कलात्मक अभिव्यक्तीला आणि आत्मविश्वासाला चालना मिळाली. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना विद्यापीठस्तरीय सांस्कृतिक स्पर्धांचा अनुभव मिळाला. विद्यार्थी कल्याण मंडळाच्या मार्गदर्शनाखाली सदर सहभाग यशस्वीरीत्या पार पडला

. प्रा. के.डी. मांडगे

विद्यार्थी कल्याण मंडळ अधिकारी

साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालय